# -: प्रेसनोट :- दि.२२/१०/२०१८

**सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.नं.२९९/१८ भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३ (२५) प्रमाणे दाखल गुन्ह्याची माहीतीबाबत.**

-----------------------------------------------------:-::::---------------------------------------------

आज दि. २२/१०/२०१८ रोजी सहकारनगर पोलीस स्टेशन येथे इसम नामे-चंदन बालाजी नायडु, रा-बालाजीनगर धनकवडी पुणे. यांनी फोन करुन कळविले की, “शाहु बँक चौक,पुणे-सातारा रोड बालाजीनगर येथील हॉटेल रेणुका समोर असणाऱ्या स्पीड ब्रेकर वरती बंदुकीच्या गोळया पडलेल्या आहेत.व एका मोटार सायकल वरील दोन इसमांनी त्या पडलेल्या बंदुकीच्या गोळया पैकी काही गोळया सदरचे इसम उचलुन घेवुन ते त्यांच्याकडील मोटार सायकल क्र.एम.एच १२ एम.के १९७४ वरुन अहिल्यादेवी चौकाकडे निघुन गेले आहेत.”अशी माहिती कळविल्याने सदर घटनास्थळी धनकवडी मार्शलचे कर्मचारी पोलीस हवा ४६२ भालेराव, पोलीस शिपाई ६६४९ पवार असे जावुन त्यांनी सदर घटनास्थळावरुन १३ राऊंड ९ एम.एम.चे आकाराच्या पिस्टलच्या गोळया श्री.चंदन बालाजी नायडु रा-२२/१६ श्रीनिवास बंगला बालाजीनगर धनकवडी पुणे.यांचेकडुन ताब्यात घेवुन ते राऊंड पोलीस स्टेशन येथे आणुन हजर केले.व सदर बाबत पोलीस स्टेशन येथे हजर असलेले अधिकारी व अंमलदारांना माहिती दिली. तेव्हा सदर घटनास्थळी आम्ही स्वतः व मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. अनिल शेवाळे साहेब, मा.पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. विजय पुराणीक साहेब, पोलीस निरीक्षक, श्री.गुरव साहेब, मा.महिला पोलीस उप-निरीक्षक, पाटील मॅडम, पोलीस हवा १५७७ मोरे, पोलीस नाईक ११६१ चव्हाण असे मिळुन सदर घटनास्थळी गेलो असता सदर घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली असता सदर घटनास्थळाचे बाजुला पाच ९ एम.एम.चे राऊंड मिळाले, सदर घटनास्थळी पोलीसां समवेत हजर असणारे इसम नामे-चंदन बालाजी नायडु रा-बालाजीनगर धनकवडी पुणे.याच्याकडे चौकशी केली असता त्याने सदर घटनास्थळावरुन दोन इसम मोटार सायकल काळया रंगाची होंडा कंपनीची या मोटार सायकल वरुन येवुन सदर मोटार सायकल शाहु बँक चौकात लावुन तीचेवरुन दोन तरुण उतरुन पाठीमागे शाहु बँक चौकातील रेणुका व्हेज-नॉनव्हेज हॉटेल समोर असणाऱ्या स्पीड ब्रेकर वरुन एका प्लॅस्टीक पिशवीमध्ये असणारे बंदुकीच्या गोळया उचलुन घेवुन गेले.सदर तरुणापैकी गाडी चालवणारा तरुण वय अंदाजे २५ ते ३० वर्षे,अंगाने मजबुत,रंगाने सावळा,अंगात काळया रंगाचा जॅकेट,फिक्कट निळया रंगाची जिन पॅन्ट,पायात स्पोर्ट शुज व दुसरा तरुणाचे वय अंदाजे २२ ते २५ वर्षे,अंगाने मध्यम,रंगाने गोरा,अंगात फुल बाहयाचा टिशर्ट व निळया रंगाची जिन्स घातलेली अशा वर्णनाचे इसम व त्यांच्या गाडीचा नं-एम.एच १२ एम.के १९७४ असा आहे.अशी माहिती दिल्याने सदर गाडी मालकाचा शोध घेतला असता सदरची गाडी ही अरुण यदु शिंदे रा-२४/अे विठ्ठल मंदिर जवळ गावठाण पिंपळसुटी ता.शिरुर जि.पुणे. यांचे नावे असल्याचे समजले तेव्हा गाडी मालकाशी संपर्क साधला असता सदर गाडी त्यांचा मुलगा राहुल अरुण शिंदे याच्याकडे असल्याचे सांगितल्याने सदरचे इसम हे के.के.मार्केट येथे असल्याचे आम्हांस समजल्याने आम्ही स्वतः व पोलीस उप-निरीक्षक,गुरव,पोलीस नाईक ११६१ चव्हाण असे मिळुन के.के.मार्केट येथील अशियाना ॲकॅडमी येथे गेलो असता सदर वर्णनाचे इसम हे के.के.माकेट येथे मिळुन आल्याने त्यांना त्यांचे नाव व पता विचारता त्यांनी त्यांचे नाव १) राहुल अरुण शिंदे,वय २५ वर्षे,धंदा-शिक्षण रा-सुंदरबन गार्डन,पहिला मजला,फ्लॅट नं ४ सिहंगड रोड पुणे.मुळगाव- मु.पो. पिंपळसुटी ता.शिरुर जि.पुणे. २) मिलींद प्रकाश शिर्के,वय २५ वर्षे,धंदा-शिक्षण रा-तुळजा भवानी अपार्टमेंट,चौथा मजला,फ्लॅट नं – नऱ्हे गाव पुणे.मुळगाव-मु.पो.आडुळ ता.पाटण जि.सातारा असे असल्याचे

सांगितले.तेव्हा सदर ठिकाणी असणारे दोन इमसांना घडल्या प्रकाराची माहिती देवुन सदर इसमांची अंगझडती घ्यावयाची असल्याने आपण पंच म्हणुन हजर रहा असे कळविल्याने व त्यांनी स्वखुशीने सहमती दर्शविल्याने सदर इसमांची अंगझडती घेता यातील इसम नामे-राहुल अरुण शिंदे याचे अंगातील काळया रंगाचे जॅकेटचे उजव्या बाजुचे खिशामध्ये ९ एम.एम.चे ७ राऊंड मिळुन आले तसेच यातील इसम नामे-मिलींद प्रकाश शिर्के याचे जिन्स पॅन्टचे डाव्या बाजुचे खिशामध्ये ९ एम.एम.चे ५ राऊंड मिळुन आले त्याचा तसा सविस्तर पंचनामा पोलीस उप-निरीक्षक गुरव यांनी केला आहे.वरील इसमांना विना परवाना बेकायदेशीर पणे ९ एम.एम.चे राऊंड बाळगल्याने त्यांना पोलीस स्टेशन येथे आणुन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सदर राऊंड बेकायदेशीर पणे विना परवाना ताब्यात घेवुन त्यांची पोलीस स्टेशनला माहिती न देता स्वतः जवळ गैर उद्देशाने बाळगले.पंचासमक्ष सदरचे ९ एम.एम.चे एकुण १२ राऊंड रितसर पंचनामा करुन ताब्यात घेतले.तसेच सदर इसमांना पुढील कायदेशीर कारवाई करीता पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले.

सदर राऊंड बाबत चौकशी केली असता सदरचे राऊंड हे भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे सी.आर.मोबाईल वरील पोलीस कर्मचारी पोलीस शिपाई बं.नं-९१७२ श्री.लांबदरे यांचे असल्याचे समजले आहे.तसेच त्यांनी त्याबाबत पोलीस स्टेशनला माहिती दिली.

इसम नामे-१) राहुल अरुण शिंदे,वय २५ वर्षे,धंदा-शिक्षण रा-सुंदरबन गार्डन,पहिला मजला,फ्लॅट नं ४ सिहंगड रोड पुणे.मुळगाव- मु.पो. पिंपळसुटी ता.शिरुर जि.पुणे. २) मिलींद प्रकाश शिर्के,वय २५ वर्षे,धंदा-शिक्षण रा-तुळजा भवानी अपार्टमेंट,चौथा मजला,फ्लॅट नं – न-हे गाव पुणे.मुळगाव-मु.पो.आडुळ ता.पाटण जि.सातारा यांनी बेकायदेशीर विना परवाना ९ एम.एम.चे १२ राऊंड जवळ बाळगले व त्या १२ राऊंडची आप-आपसात ७-५ अशी वाटणी करुन घेतल्याने त्यांचे विरुद्ध हत्यार कायदा कलम ३,२५ प्रमाणे कायदेशीर फिर्याद गु. र. नं. २९९/१८ भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३ (२५) अन्वये दाखल करुन त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे करीत आहे.

सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर